# विमा संचालनालयांतर्गत तांत्रिक सहायक, विमा संचालनालय, गट-'क' परीक्षा

**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील :-**

**१.१** राज्य शासनाच्या सेवेतील वित्त विभागाच्या अखत्यारीतील विमा संचालनालयाअंतर्गत तांत्रिक सहायक, गट-क संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात.

**१.२ पदांचा तपशील :-**

**१.२.१ संवर्ग :-** अराजपत्रित, गट -क.

**१.२.२ नियुक्तीचे ठिकाण :-** राज्य शासनाच्या वित्त विभागाच्या अखत्यारीतील विमा संचालनाअंतर्गत महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात.

**१.२.३ वेतनबँड व ग्रेड वेतन : -** रुपये ५,२००-२०,२०० ग्रेड पे-२८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते.

**१.२.४ उच्च पदावर बढतीची संधी :-** ज्येष्ठता व पात्रतेनुसार कनिष्ठ तांत्रिक अधिकारी व त्यावरील पदे.

**१.३** शासनाच्या मागणीनुसार भरावयाच्या पदांचा तपशील, पदसंख्या, आरक्षण, अर्हता, इत्यादी बाबी जाहिरात / अधिसूचनेद्वारे उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येतील.

**२. परीक्षेचे टप्पे :-**

**२.१** एक - फक्त लेखी परीक्षा. एकूण ४०० गुण

**३. अर्हता :-**

**३.१** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने विहित केलेली समतुल्य अर्हता.

**३.२** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**३.३** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने ही अट मुख्य परीक्षेची माहिती स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यत पूर्ण केली असली पाहिजे.

**४ शुल्क (फी) :-**

**४.१** प्रस्तुत भरतींकरिता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे :-

| अमागास | मागासवर्ग | माजी सैनिक |
|---|---|---|
| रुपये ५२३/- | रुपये ३२३/- | रुपये २३/- |

**४.२** वि.जा.(अ),भ.ज.(ब),भ.ज.(क),भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व., प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रीमी लेअर) मोडणाऱ्या उमेदवारांनी त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**४.३** क्रीमी लेअर संदर्भातील उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

**४.४** दिनांक १ जानेवारी, १९६४ ते २५ मार्च,१९७१ या कालावधीत पूर्व पाकिस्तानातून स्थलांतर क रू न भारतामध्ये आलेल्या आणि दिनांक १ जून,१९६३ नंतर स्थलांतर करून भारतात आलेल्या मूळचे भारतीय असलेल्या श्रीलंकेतील स्वदेश प्रतावर्ती उमेदवारांनी कोणतेही परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

**५. परीक्षा योजना :-**

**५.१ प्रश्नपत्रिका :-** एक. प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| विषय | प्रश्नसंख्या | गुण | माध्यम | दर्जा | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी | ५० | १०० | मराठी | शालांत | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| इंग्रजी | ५० | १०० | इंग्रजी | पदवी | | |
| सामान्य ज्ञान व बुध्दिमापन चाचणी आणि विमा संचालनालयांतर्गत माहिती | १०० | २०० | मराठी व इंग्रजी | संबंधित विभागात काम करण्यास आवश्यक ज्ञान | | |

**५.२ अभ्यासक्रम :-** सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**६. परीक्षा केंद्र :-**

६.१ खालील चार ठिकाणी सदर परीक्षा घेण्यात येईल :-

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक | केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|---|---|
| औरंगाबाद | १५ | नागपूर | ३२ |
| मुंबई | ३० | पुणे | ३८ |

**६.२** उपरोक्त परीक्षाकेंद्रांमधून कोणतेही एक केंद्र अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**६.३** उपरोक्त परीक्षा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**६.४** विहित पद्धतीने माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**६.५** एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हाकेंद्रावर करण्यात येईल, असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

**६.६** एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**७. लेखी परीक्षेचा निकाल :-**

**७.१** वस्तुनिष्ठ स्वरुपांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**७.२** भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी २ पट उमेदवार प्रमाणपत्र पडताळणीसाठी उपलब्ध होतील, अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल.

**७.३** गुणांची सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी तसेच महिला, खेळाडू इत्यादींसाठी वेगवेगळी असेल.

**७.४** प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे ते विहित अटींची पूर्तता करतात, असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात प्रमाणपत्र पडताळणीसाठी पात्र समजण्यात येईल.

**७.५** विकलांग अथवा अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू या प्रवर्गाच्या किमान सीमा रेषेच्या आधारे पात्र ठरणा- या उमेदवारास दोन्हीपैकी एकच सवलत घेता येईल.

**७.६** निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, प्रमाणपत्र पडताळणीसाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस.द्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

**७.७** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), व इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उमेदवार तसेच विकलांग, महिला, माजी सैनिक व पात्र खेळाडू उमेदवार लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ त्या त्या संबंधित प्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाणार नाही.

**८. प्रमाणपत्र पडताळणी :-**

**८.१** पात्र उमेदवारांना प्रमाणपत्र पडताळणीसाठी बोलविण्यात येईल.

**८.२** प्रमाणपत्र पडताळणीचा कार्यक्रम निश्चित झाल्यानंतर पात्र उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलद्वारे पत्र उपलब्ध करुन देण्यात येईल.

**८.३** आयोगाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/शासन परिपत्रकातील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल.

**८.४** अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी केली जाईल.

**८.५** विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**८.६** वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाआधारे पात्र ठरणा-या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेस करण्यात येईल.

**९. अंतिम निकाल : -**

लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ताक्रमानुसार यादी (Merit List) तयार करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादीमध्ये समान गुण धारण करणा -या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) " **उमेदवारांना सर्वसाधारण सूचना** " मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार ठरविण्यात येइल.

**१०. शिफारस :-**

**१०.१** **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना "** मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येईल.

**१०.२** लेखी परीक्षेमधून शिफारसपात्र होण्याकरिता शतमत (Percentile) पध्दत लागू आहे. प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवारांच्या एकूण गुणांच्या खालीलप्रमाणे किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार शिफारशीसाठी पात्र असतील :-

**(१) अमागास - किमान ३५ शतमत**
**(२) मागासवर्गीय -किमान ३० शतमत**
**(३) विकलांग- किमान २० शतमत**
**(४) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू - किमान २० शतमत**
**(५) माजी सैनिक - किमान २० शतमत**

**१०.३** विकलांग अथवा अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू अथवा माजी सैनिक या प्रवर्गाच्या किमान सीमारेषेच्या आधारे शिफारशीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारास कोणतीही एक सवलत घेता येईल.

**१०.४** परीक्षेस उपस्थित राहिलेल्या उमेदवारांना शिफारसीनंतर त्यांची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आली आहे किंवा नाही, ते प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल. तसेच, शिफारस झालेल्या उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

************